### रालोआ लागली कामाला : इंडिया आघाडीतील पाच पक्षांची तयारी सुरू

# भाजपाचे मिशन बिहार

**दिल्ली,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. दिल्लीत तब्बल २७ वर्षानंतर भाजपाला सत्ता स्थापन करण्यात यश मिळाले. तर मागील दोन विधानसभा निवडणुकीत 'आप'ने ६० पेक्षा अधिक जागा जिंकत एकहाती सत्ता मिळवली होती. यंदा त्यांचा केवळ २२ जागांवर विजय झाला आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीनंतर आता भाजपाचे लक्ष असणार आहे ते म्हणजे बिहार विधानसभा निवडणुकीकडे दिल्लीतील विजयानंतर भाजपाचा उत्साह कमालीचा शिगेला पोहचला आहे आणि याचा थेट परिणाम बिहार निवडणुकीवर होणार असल्याचे स्पष्ट आहे. दिल्ली विधानसभा निवडणूक निकालानंतर भाजपा मुख्यालयात पंतप्रधान मोदी यांनी भाषणात बिहारचा उल्लेख करत मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या विकासकामांचा उल्लेख केला. तेव्हाच स्पष्ट झाले की दिल्ली काबीज केल्यानंतर आता भाजपा व रालोआचे आगामी लक्ष बिहार विधानसभा निवडणूक आहे. याप्रसंगी पंतप्रधान मोदींनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना म्हटले होते की, बिहारमध्ये बदल तेव्हाच घडला जेव्हा नितीशकुमार हे बिहारचे मुख्यमंत्री झाले आणि जेव्हा रालोआचे सरकार बनले. रालोआ म्हणजे विकासाची गॅरंटी, सुशासनाची गॅरंटी. याद्वारे एकप्रकारे जाहीर संकेत मिळाले आहेत की, बिहार निवडणूक जिंकण्यासाठी भाजपा कोणतीही कसर सोडणार नाही. तर दिल्लीत २७ वर्षानंतर भाजपच्या विजयावर बिहारमधील प्रमुख नेते जीतन राम मांझी यांनी दिल्ली अभी झांकी है, बिहार अभी बाकी है, असे म्हंटले होते.

### नितीशकुमार- तेजस्वी असे मुख्यमंत्रिपदाचे चेहरे

बिहारमध्ये ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये निवडणुका होण्याची शक्यता आहे. एनडीएने २४३ विधानसभा सदस्य असणाऱ्या २२५ हून अधिक जागा जिंकण्याचे लक्ष समोर ठेवले आहे. परंतु बिहारची निवडणूक इतर कोणत्याही राज्यापेक्षा पूर्णपणे भिन्न आहे. रालोआतून मुख्य चेहरा म्हणून मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या नेतृत्वाखाली बिहार विधानसभा निवडणुका लढण्याची शक्यता आहे, तर इंडिया आघाडी चेहरा म्हणून तेजस्वी यादव असेल. गेल्या तीन दशकांपासून बिहारच्या राजकारणावर नितीशकुमार आणि लालू प्रसाद यादव या दोन नेत्यांनी प्रभाव प्रस्थापित केला आहे. जरी लालू यादव यापुढे राजकीयदृष्ट्या सक्रिय नसले तरी बिहारमधील त्यांचा प्रभाव कमी झाला नाही. त्यांचा मुलगा तेजस्वी यादव आता लालू यादव यांच्या राजकीय वारसाला पुढे आणत आहे. नितीश कुमार हे दोन दशकांपासून बिहारचे मुख्यमंत्री आहेत. २०१५ मध्ये त्यांनी काही महिने हे पद सोडले आणि जितन राम मांझी यांना मुख्यमंत्री बनविले. या काळात नितीश कुमार यांनी युती बदलली, परंतु मुख्यमंत्र्यांची खुर्ची त्यांच्यासोबत कायम राहिली.



### इंडिया-रालोआ थेट लढत?

बिहार विधानसभा निवडणुकी एकीकडे भाजपाच्या नेतृत्वात रालोआ असेल, तर दुसरीकडे राष्ट्रीय जनता दलच्या नेतृत्वात इंडिया आघाडी असेल. रालोआमध्ये भाजपासोबत जदयू , लोजपा (राम विलास), हिन्दुस्तानी आवाम मोर्चा सेक्युलर आणि राष्ट्रीय लोक मोर्चाचा समावेश आहे. तर इंडिया आघाडीमध्ये राजद, काँग्रेस, डावे पक्ष आणि विकासशील इंसान पार्टीचा समावेश असेल. गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत बिहारमधील ४० पैकी ३० जागा सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीला मिळाल्या होत्या. त्यात भाजपा आणि नितीशकुमार यांच्या संयुक्त जनता दलाला प्रत्येकी १२ जागा मिळाल्या. चिराग पासवान यांच्या पक्षाला ५ तर हिंदुस्थानी आवामला एक जागा मिळाली. राष्ट्रीय जनता दल, काँग्रेस आणि डाव्या पक्षांच्या इंडिया आघाडीला ९ जागा मिळाल्या.

# अभिजीत मुखर्जींची काँग्रेसमध्ये 'घरवापसी'

### तृणमूलला रामराम

**कोलकाता,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. विधानसभा निवडणूक स्वबळावर लढण्याची तयारी करणाऱ्या ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांचे पुत्र अभिजीत यांनी तृणमूल काँग्रेस सोडून काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. अभिजीत बुधवारी काँग्रेसमध्ये सहभागी झाले. ते म्हणाले की मी माझ्या घरी परत येत आहे. मला हे करण्यापासून काय रोखणार आहे? दिल्लीहून कोलकात्याला यायला वेळ लागतो. काँग्रेस पक्षाची स्थिती कशी आहे हे महत्त्वाचे नाही. काँग्रेस सोडून तृणमूल काँग्रेसमध्ये सहभागी होण्याबाबत अभिजीत म्हणाले की, ते वैयक्तिक कारणांसाठी तिथे गेले होते. मी ती कारणे उघड करू इच्छित नाही. त्यांना जी काही जबाबदारी देण्यात येईल ती ते पूर्ण करतील असेही त्यांनी स्पष्ट केले. आम्ही ऑर्डर पुढे नेणारे लोक आहोत. अभिजीतच्या काँग्रेसमध्ये परतण्याची बातमी पक्षाच्या बंगाल प्रदेशशी संबंधित नेत्यांनी आधीच निश्चित केली होती. बंगाल काँग्रेसचे अध्यक्ष शुभंकर सरकार म्हणाले की, अभिजीत काँग्रेसमध्ये सहभागी झाल्याने पक्ष मजबूत होईल. ज्यांची विचारसरणी राहुल गांधींशी जुळते त्यांनी काँग्रेसमध्ये सहभागी व्हावे अशी आमची इच्छा आहे.



### २०११ मध्ये काँग्रेस सोडली

अभिजित मुखर्जी २०११ मध्ये काँग्रेस सोडून तृणमूल काँग्रेसमध्ये सहभागी झाले होते. गेल्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीचे निकाल समोर आल्यापासून ते अधूनमधून काँग्रेसच्या बाजूने उभे राहण्याचा प्रयत्न करताना दिसले. जून २०२४ मध्येच अभिजीत यांनी काँग्रेसमध्ये सहभागी होण्याची इच्छा व्यक्त केली होती आणि पक्ष नेतृत्वाला भेटण्यासाठी वेळही मागितला होता.

# नागरी निवडणुका मतपत्रिकेवर घेण्यास आयोगाचा नकार

### काँग्रेसची सर्वोच्च न्यायालयातही याचिका दाखल

**चंदीगड,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. हरयाणामध्ये मतपत्रिकेद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका घेण्याची काँग्रेसची मागणी निवडणूक आयोगाने फेटाळून लावली आहे. निवडणूक आयोगाच्या या निर्णयावर हरयाणा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते,आमदार अशोक अरोरा म्हणाले की, निवडणूक आयोगाने आमची मागणी फेटाळली असली तरी पक्षाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. अशोक अरोरा यांनी सांगितले की, पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चौधरी उदयभान यांच्या नेतृत्वाखाली मुख्य निवडणूक आयुक्तांसोबत बैठक झाली. देशभरातील ईव्हीएमवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याची आमची मागणी होती. त्यांना असेही सांगण्यात आले की हरयाणा विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर काँग्रेस पक्षाच्या १८ पराभूत उमेदवारांनी पंजाब आणि हरयाणा उच्च न्यायालयात ईव्हीएमबाबत विजयी उमेदवारांविरुद्ध याचिका दाखल केली आहे. याशिवाय, पक्षाने सर्वोच्च न्यायालयातही याचिका दाखल केली आहे. कायद्यात अशी तरतूद आहे की निवडणूक आयोग मतपत्रिकेद्वारे किंवा ईव्हीएमद्वारे मतदान करू शकतो. परंतु निवडणूक आयोगाने मतपत्रिकेद्वारे नागरी निवडणुका घेण्याची आमची मागणी फेटाळून लावली आहे.



# मी पत्राचे तुकडे करून जाळून टाकीन

### अनिल विज यांनी भाजपाला ८ पानांचे उत्तर पाठवले



**चंदीगड,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. भाजपाला पाठवलेल्या कारणे दाखवा नोटीसचे उत्तर पाठवल्यानंतर, हरयाणाचे वाहतूक आणि ऊर्जा मंत्री अनिल विज यांनी त्याच्या खिशातून फाटलेले तुकडे काढले आणि ते माध्यमांना दाखवले. भाजपा प्रदेशाध्यक्ष मोहनलाल बरोली यांनी पाठवलेल्या कारणे दाखवा नोटीसला अनिल विज यांनी उत्तर दिले आहे. हे उत्तर ८ पानांचे आहे. विजने याबद्दल काहीही सांगण्यास नकार दिला आणि सांगितले की पत्र पाठवल्यानंतर मी ते फाडले आणि ते तुकडे माझ्या खिशात ठेवले. जे मी जाळून टाकीन. विजने सांगितले की जर त्याला आणखी काही हवे असेल तर मी तेही देईन. विज यांनी माध्यमांना सूचना लीक करण्याबद्दलही प्रश्न उपस्थित केले. ते म्हणाले की जर पक्षाला हवे असेल तर ते चौकशी करू शकतात की नाही, हा त्यांचा निर्णय आहे. तथापि, विज यांनी नोटीसशी संबंधित कोणत्याही प्रश्नांची उत्तरे देण्यास नकार दिला.

### मी मीडियाला सांगणार नाही, मी पत्र नष्ट केले

मी उत्तर आधीच पाठवले. मी ३ दिवस बाहेर होतो. रात्री बंगळुरूहून आलो. घरी गेलो. थंड पाण्याने आंघोळ केली. मी भाकरी खाल्ली आणि बसून उत्तर दिले. मी काल रात्रीच माझे उत्तर वेळेआधी पाठवले. मला ३ दिवसांचा वेळ देण्यात आला. मी त्यात असेही लिहिले आहे की जर तुम्हाला इतर कोणत्याही गोष्टीचे उत्तर हवे असेल तर मला कळवा, मी तेही लेखी स्वरूपात देईन. मला जे काही आठवत होते आणि जे काही मनात येत होते ते मी लिहून ठेवले. मी पत्र नष्ट केले, मी मीडियाला सांगणार नाही. मी लिहिलेले पत्र नष्ट केले आणि त्याच्या कात्रणे माझ्या खिशात ठेवल्या आहेत, घरी पोहोचल्यावर मी त्या जाळून टाकेन. जेव्हा विज यांना विचारण्यात आले की त्यांनी उत्तरात काय लिहिले आहे, तेव्हा त्यांनी सांगितले की ते माध्यमांमध्ये सार्वजनिक केले जाऊ शकत नाही. विज म्हणाले की, ही सूचना माध्यमांकडे कशी आली? हा देखील तपासाचा विषय आहे. दोन लोकांमध्ये इतका गुप्त संवाद झाला होता, तो कोण लीक करत आहे? जर पक्षाला हवे असेल तर ते त्याचीही चौकशी करू शकते. जर त्यांना ते नको असेल तर ती पक्षाची इच्छा आहे. विज म्हणाले की मला याबद्दल फक्त माध्यमांकडूनच कळले आणि मी सूचना देखील फक्त माध्यमांमध्येच वाचली.

# माझी चूक झाली, मी ती मान्य केली

### किरोडीलाल मीना यांची कबूली



**जयपूर,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. राजस्थान सरकारचे कॅबिनेट मंत्री किरोडीलाल मीणा यांनी बुधवारी नोटीस आणि त्याच्या उत्तराबाबत माध्यमांशी संवाद साधला. फोन टॅपिंगच्या मुद्द्यावर मीणा यांनी म्हटले आहे की, माझ्याकडून चूक झाली आहे आणि मी नोटीसला उत्तर देताना ती मान्य केली आहे. भाजपा प्रदेशाध्यक्षांना अनुशासनहीनतेवर कारवाई करण्याचा अधिकार आहे. मंत्री झबरसिंग खर्रा आणि मुख्यमंत्री कारवाईबद्दल सांगू शकत नाहीत. बुधवारी सकाळी, कॅबिनेट मंत्र्यांनी पक्षाच्या सूचनेला ई-मेलद्वारे उत्तर दिले. यामध्ये मंत्र्यांनी लिहिले आहे की- माझा फोन टॅप केला जात आहे. मला यासाठी इनपुट मिळाला. खरंतर, किरोडीलाल मीणा यांनी त्यांच्याच सरकारवर फोन टॅपिंगचा आरोप केला होता. तेव्हापासून सरकार आणि भाजपा विरोधकांच्या निशाण्यावर आहेत. या मुद्द्यावर मुख्यमंत्र्यांच्या उत्तरावरून विधानसभेत गदारोळ झाला.

### किरोडीलाल यांचे हायकमांडला उत्तर

माझा फोन टॅप केला जात आहे. मला यासाठी इनपुट मिळाला. मी हे माध्यमांमध्ये कोणालाही सांगितले नाही. मी एका सामाजिक कार्यक्रमात माझे विचार व्यक्त केले. जे कोणीतरी व्हायरल केले. मी नेहमीच पक्षासाठी काम केले आहे. मी पक्षाचा एक शिस्तबद्ध सैनिक आहे. पक्षाकडून मिळालेल्या नोटीस आणि त्याच्या उत्तराबाबत किरोडीलाल यांनी जयपूरमध्ये पहिल्यांदाच भाष्य केले. ते म्हणाले की, मी काय उत्तर दिले ते मी सांगणार नाही. मी कोणावरही रागावत नाही; जर मी रागावलो असतो तर मी हसणार नाही.

### मुख्यमंत्र्यासह दोन आमदारही रडारवर ● ११ कोटींची केली मागणी

# राज्यपालांची ममतांना नोटीस

**कोलकाता,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. बंगालमधील सत्ताधारी तृणमूल काँग्रेस आणि राज्यपाल यांच्यातील तणाव पुन्हा वाढला आहे. राज्यपाल सी व्ही आनंद बोस यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, कुणाल घोष आणि तृणमूल काँग्रेसच्या दोन आमदारांना मानहानीची नोटीस पाठवली आहे. बोस यांनी पाठवलेल्या या नोटीसमध्ये सर्व नेत्यांना सांगण्यात आले आहे की तुम्ही राज्यपालांची बदनामी केली आहे. जर या संदर्भात तात्काळ माफी मागितली नाही तर प्रत्येकी ११ कोटी रुपयांचा मानहानीचा दावा दाखल केला जाईल.



ही नोटीस नवनिर्वाचित तृणमूल काँग्रेसच्या आमदार सायंतिका बॅनर्जी आणि रयत हुसेन सरकार यांना पाठवण्यात आली आहे. देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच राज्यपालांनी मुख्यमंत्री आणि आमदारांना मानहानीची नोटीस पाठवली आहे.

### नोटीसचे संपूर्ण प्रकरण काय आहे?



मे २०२४ मध्ये, बंगालच्या २ विधानसभा जागांवर पोटनिवडणुका झाल्या, ज्यामध्ये बारानगर मतदारसंघातून सायंतिका बॅनर्जी आणि भगवानगोला मतदारसंघातून रयत सरकार विजयी झाले. दोन्ही आमदारांच्या शपथेबाबत समस्या होती. राज्यपालांनी विधानसभा अध्यक्षांना शपथ देण्याचा अधिकार दिला नाही. राज्यपालांनी सांगितले की, उपसभापतींनी दोघांनाही शपथ द्यावी. दोन्ही आमदारांनी राजभवनात जाऊन शपथ घेण्यास नकार दिला. या आमदारांनी सांगितले की राजभवन सुरक्षित नाही. जेव्हा संपूर्ण घटना घडत होती, तेव्हा बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राजभवनाबद्दल गंभीर टिप्पणी केली होती. ममता म्हणाल्या की, राजभवनात महिला सुरक्षित नाहीत. तथापि, कोलकाता उच्च न्यायालयाने ममता यांना राजभवनाबद्दल अशा टिप्पण्या करू नयेत असे सांगितले होते. या घटनेदरम्यान दोन्ही आमदारांनी राज्यपालांवर गंभीर आरोप केल्याचे बोलले जात आहे, ज्यासाठी आता कायदेशीर नोटीस पाठवण्यात आली आहे.

### नोटीसच्या रक्कमेवर प्रश्न

राज्यपाल सी.व्ही. बोस यांनी पाठवलेल्या मानहानीच्या नोटीसमध्ये ११-११ कोटी रुपयांचा उल्लेख आहे. विशेष म्हणजे, सायंतिका बॅनर्जी यांची एकूण मालमत्ता ४५ लाख रुपये आहे आणि रयत हुसेन सरकार यांची एकूण मालमत्ता ३ कोटी रुपये आहे. सायंतिका ही एक बंगाली चित्रपट अभिनेत्री आहे तर सरकार यांनी तृणमूल काँग्रेसमधून राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली. तर ममता बॅनर्जी यांची एकूण मालमत्ता १६ लाख रुपये आहे. ममता यांनी अलिकडेच हे उघड केले होते.

## # QUICK NEWS

### गुजरातमधून १५ बांगलादेशींना हद्दपार

**अहमदाबाद.** अमेरिकेतून बेकायदेशीर भारतीय स्थलांतरितांच्या परतल्यानंतर, गुजरात पोलिसांनी बेकायदेशीरपणे भारतात प्रवेश केलेल्या १५ बांगलादेशींना हद्दपार केले आहे. गुजरातचे गृह राज्यमंत्री हर्ष संघवी यांनी बुधवारी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर ही माहिती शेअर केली. अहमदाबाद गुन्हे शाखेने बांगलादेशींना हद्दपार केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. हे सर्वजण अल्पवयीन मुलींना वेश्याव्यवसायात ढकलण्याच्या कारवायांमध्ये सहभागी होते. हे सर्वजण बनावट कागदपत्रांच्या मदतीने अहमदाबादमध्ये भारतात राहत होते. बनावट भारतीय कागदपत्रे बनवणाऱ्या एका टोळीचाही पर्दाफाश झाला आहे. हे कागदपत्रे बेकायदेशीर स्थलांतरितांना दिली जात होती. पोलिसांनी ५० बेकायदेशीर स्थलांतरितांनाही अटक केली आहे.

### शेतकरी नेते सिरसा रुग्णालयात दाखल

**चंदीगड.** ज्येष्ठ शेतकरी नेते बलदेवसिंग सिरसा यांना बुधवारी खानौरी आंदोलनस्थळी हृदयविकाराची समस्या उदभवल्यामुळे पटियाला येथील सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. खानौरीमध्ये उपस्थित असलेल्या शेतकरी नेत्यांनी सांगितले की, सिरसा गेल्या अनेक महिन्यांपासून शेतकऱ्यांच्या आंदोलनात सहभागी आहे. बुधवारी सकाळी अचानक सिरसा यांना छातीत दुखू लागले त्यानंतर त्यांना पटियाला येथील सरकारी राजिंद्र रुग्णालयात नेण्यात आले. आंदोलनस्थळी उपस्थित असलेल्या एका स्वयंसेवी संस्थेच्या डॉक्टरांनी सांगितले की, शेतकरी नेत्याने अस्वस्थतेची तक्रार केल्यानंतर त्यांनी त्यांची तपासणी केली तेव्हा त्यांना कमी रक्तदाब असल्याचे आढळून आले. त्यांच्या इलेक्ट्रोकार्डियोग्राम (ईसीजी) अहवालात हृदयविकाराचा त्रास असल्याचे दिसून आले. त्यांनी यापूर्वीही हृदयविकाराची तक्रार केली होती.

### मध्य प्रदेशातून आरोपीस केली अटक

# मोठा डॉन बनण्यासाठी दिली योगींना धमकी

**मोरेना,** एजन्सीज. उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी फोन करून मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. अटक करण्यात आलेला आरोपी सुनील गुर्जर आहे, तो मध्य प्रदेशातील मुरैना जिल्ह्यातील रहिवासी आहे. मुख्यमंत्री योगी यांना धमकी मिळाल्यानंतर, यूपी एसटीएफचे पथक त्यांच्या गावात पोहोचले आणि त्यांना अटक केली. चौकशीदरम्यान आरोपींनी जे सांगितले ते ऐकून पोलिस अधिकारीही आश्चर्यचकित झाले. जेव्हा पोलिस अधिकाऱ्यांनी आरोपीला धमकीचे कारण विचारले तेव्हा त्याने सांगितले की त्याला देशातील सर्वात मोठा डॉन बनायचे आहे.

**कुटुंबासह गाव सोडून पळणार होता :** गावकऱ्यांनी सांगितले की, उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांना धमकी दिल्यानंतर आरोपी सुनीलला भीती होती की पोलिस त्याला अटक करण्यासाठी येतील. अशा परिस्थितीत त्याने कुटुंबासह घरातून पळून जाण्याचा विचार केला होता.



तथापि, तो पळून जाण्यापूर्वीच, यूपी एसटीएफ आणि मोरेना सिव्हिल लाइन्स पोलिसांनी त्याच्या घरावर छापा टाकला आणि त्याला अटक केली. आरोपी सुनीलने कोणत्याही दहशतवादी संघटनेकडून किंवा इतर स्रोतांकडून निधी घेऊन मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना धमकी दिली होती का, हे शोधण्यासाठी यूपी एसटीएफ आरोपी सुनीलच्या बँक खात्याची आणि मोबाईलची चौकशी करत आहे.

### १० नावांतून निवडणार दिल्लीचा नवा मुख्यमंत्री

**दिल्ली.** विधानसभा निवडणुकीत भाजपाने प्रचंड बहुमताने विजय मिळवला आहे. सुमारे २७ वर्षांनी भाजपाला दिल्लीत मुख्यमंत्री मिळेल. तथापि, मुख्यमंत्रीपदासाठी अद्याप कोणत्याही आमदाराचे नाव जाहीर झालेले नाही. पुढचा मुख्यमंत्री कोण असेल यावर पक्षात अजूनही चर्चा सुरू आहे. आमदारांसह वरिष्ठ नेत्यांच्या बैठकांचा सिलसिला सुरूच आहे. दरम्यान, मंगळवारी भाजपाच्या नवनिर्वाचित १० आमदारांनी राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांची भेट घेतली. मीडिया रिपोर्ट्सनुसार, जे पी नड्डा यांच्यासोबत या बैठकीला उपस्थित असलेले आमदारांचे मुख्यमंत्रीपदाच्या यादीत नाव आहे. तथापि, भाजपाच्या अधिकृत सूत्रांचे म्हणणे आहे की ही एक औपचारिक बैठक होती. जेपी नड्डा यांना भेटणाऱ्यांमध्ये विजेंद्र गुप्ता, शिखा राय, रेखा गुप्ता आदी उपस्थित होते. अरविंदर सिंग लवली, अजय महावार, कुलवंत राणा, सतीश उपाध्याय, अनिल शर्मा, डॉ. अनिल गोयल आणि कपिल मिश्रा यांचा समावेश होता.

### 'मी पळून गेलेलो नाही, मतदारसंघात आहे'

**दिल्ली,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. ओखला येथील आपचे आमदार अमानतुल्ला खान यांनी दिल्ली पोलिस आयुक्तांना पत्र लिहून त्यांच्या अटकेसाठी सुरू असलेल्या शोधात ते फरार असल्याच्या वृत्तांचे खंडन केले आहे. ते म्हणाले की मी कुठेही पळून गेलेलो नाही माझ्या मतदार संघातच आहे.

### शीखविरोधी दंगली: दिल्ली न्यायालय १८ ला शिक्षा सुनावणार

# खून प्रकरणात सज्जनकुमार दोषी



**दिल्ली.** दिल्लीतील एका न्यायालयाने बुधवारी माजी काँग्रेस खासदार सज्जन कुमार यांना शीखविरोधी दंगलीदरम्यान सरस्वती विहार परिसरातील दोन जणांच्या हत्येप्रकरणी दोषी ठरवले. विशेष न्यायाधीश कावेरी बवेजा यांनी दोषसिद्धीचा आदेश दिला आणि शिक्षेसाठी १८ फेब्रुवारीची तारीख निश्चित केली. शिक्षेसाठी कुमारला तिहार तुरुंगातून न्यायालयात हजर करण्यात आले. हा खटला १ नोव्हेंबर १९८४ रोजी जसवंत सिंग आणि त्यांचा मुलगा तरुणदीप सिंग यांच्या हत्येशी संबंधित आहे.


**HDFC BANK** We understand your world

**प्राधिकृत अधिकारी :** एचडीएफसी बँक (लिगल विभाग), पत्ता : एचडीएफसी बँक हाऊस, पहिला मजला, एमआयटी मॅरेथॉन, बुंद गार्डन रोड, पुणे - ४११००१.

**स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना (सरफैसी कायदा, २००२ च्या नियम ९(१) सहवाचन नियम ८(६) अंतर्गत)**

सीक्युरिटायझेशन अ‍ॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अ‍ॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट (द्वितीय) अ‍ॅक्ट, २००२, जशी आहे जेथे आहे व जशी आहे जी आहे तत्त्वावर स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना.

| कर्जदारांचे नाव व कर्ज खाते क्र. | विक्री करावयाच्या मालमत्तेच्या वसुलीकरिता थकीत रक्कम | ठिकाण व स्थावर मालमत्तेच्या तपशील | राखीव मूल्य | इरठे | परिक्षणाची तारीख | इरठे सादरीकरणाची अंतिम तारीख | ई-लिलावाची तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कर्जदार व अर्जदार/ हमीदार....... १) मे. सालोम ईआरपी २) अरुण भारद्वाज- सत्यनारायण भारद्वाज यांचे पुत्र ३) स्मरणिका भारद्वाजे - अरुण भारद्वाजे यांची पत्नी कर्ज खाते क्र.: ५०२०००३९३०५०५९ व ८२०३२८० | दि. ०१.०२.२०२२ व दि. २४.०२.२०२२ रोजीनुसार रु. | १. मालमत्तेचा सर्व भाग व भूखंड धारक फ्लॅट क्र. ५, मोजमापित क्षेत्र ६७५ चौ.फूट अर्थात ६२.७३ चौ.मीटर (बिल्ट अप), दुसरा मजला व स्थित इमारत शर्मीला अपार्टमेन्ट म्हणून ज्ञात, बांधकामधारक जमिनीचा सर्व्हे क्र. १६५/२, प्लॉट क्र. ११, स्थित नोंदणीकृत उप-जिल्हा, तालुका हवेली, जिल्हा पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत व स्थित महसूल गाव मौजे पिंपरी वाघेरा. | रु. २०,००,०००/- (रु. वीस लाख मात्र) | रु. २,००,०००/- (रु. दोन लाख मात्र) | दि. १३.०२.२०२५ रोजी दु. १२.०० वा. ते दु. ३.०० वा. अधिकाऱ्यांच्या उपलब्धतेनुसार | दि. २६.०२.२०२५ | दि. २७.०२.२०२५ रोजी स. ११.०० वा. ते दु. १२.०० वा. सर्व यशस्वी बोलीदारांकरिता ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह. |

विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तींकरिता, कृपया प्रदाते लिंक व प्रतिभूत धनको वेबसाइट अर्थात https://eauction.samil.in व https://www.hdfcbank.com/personal/resources/important-notices.

**सूचनेचा कालावधी :** सदर सूचना सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या अनुच्छेद ९(१)/ नियम ८(६) अंतर्गत कर्जदारांना १५/३० दिवसांची सूचना म्हणून देखील विचारात घेतली पाहिजे.

**दिनांक : १२.०२.२०२५। ठिकाण : पुणे** — सही/- प्राधिकृत अधिकारी, एचडीएफसी बँक



**मनी२मी फायनान्स प्रा. लि. शाखा स्थलांतर**

आमच्या मौल्यवान ग्राहकांच्या चांगल्या सोयीसाठी, आम्ही आमची चंदन नगर शाखा **मनी२मी फायनान्स प्रा. लि.** च्या ठिकाणाहून हलवत आहोत, सर्वे नं. ४९/२, प्लॉट क्र. ३२, पहिला मजला, काका हलवाई जवळ, चंदन नगर बस स्टॉप समोर, तालुका हवेली, पुणे - ४११०१४ खालील नवीन ठिकाणी **२४ फेब्रुवारी २०२५** पासून लागू होईल.

**नवीन पत्ता:** मनी2मी फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड, दुकान क्रमांक २ आणि ३, सुरभी, तळमजला, सर्व्हे नंबर ४८/२, प्लॉट क्र. २, कान्हूर पाथरजवळ, पतसंस्थेजवळ, नगर रोड, चंदन नगर, पुणे – ४११ ०१४.

**संपर्क तपशील:** मोबाईल क्रमांक : ८५९१००२८१८ / २० | सपोर्ट : ०८०६९१६६२०२ | मिस्ड कॉल : 18003157055 | ईमेल: Customersupport@money2me.in

आम्ही तुमचे सतत संरक्षण आणि समर्थन मांगतो.

**दिनांक : १३.०२.२०२५ ठिकाण: पुणे**



Nippon india Mutual Fund — Wealth sets you free

**Mutual Fund Investor Awareness Program**

To increase awareness about Mutual Funds, we conduct Investor Awareness Programmes (IAPs) across the country. Schedule of upcoming IAP is as mentioned below:

| Date | Time | Location |
|---|---|---|
| 15th Feb, 2025 | 07:00 PM | Satara |

**Venue:** Maratha Palace, Satara - 415004.
**Name:** Shubhanan Date | **Mob. No.:** 9370636029
Nippon Life India Asset Management Limited | CIN : L65910MH1995PLC220793
Good gets better
Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.



**नॉर्दर्न एआरसी कॅपिटल लिमिटेड** (NORTHERN ARC)
**नोंदणीकृत कार्यालय :** १०, फेज १, आयआयटी मद्रास रिसर्च पार्क, कानगाम व्हिलेज, तारामानी, चेन्नई ६०० ०१३, तामिळनाडू.

**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शिअल असेट्स अँड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सरफेसी) कायदा २००२ चे कलम १३(२) च्या अनुसार मागणी सूचना**

ज्या अर्थी आपण कर्जदार, सह-कर्जदार, हमीदार आणि तारणदार ज्यांचा उल्लेख खालील प्रमाणे नमूद करण्यात आलेल्या तालिका मध्ये परिच्छेद क्रमांक १ मध्ये करण्यात आला आहे, त्यांनी नॉर्दर्न एआरसी कॅपिटल लिमिटेड यांच्याकडे तुमच्या अचल मालमत्ता तारण ठेऊन कर्ज घेतले आहे. त्याची परतफेड करण्यात आपण कसूर केल्यामुळे, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या दिशानिर्देशांच्या अनुसार आपले खाते एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे आणि ज्या अर्थी नॉर्दर्न एआरसी कॅपिटल लिमिटेड हे सरफैसी कायद्याच्या अनुसार संरक्षित धनको असल्यामुळे तसेच सदरील कायद्याचे कलम १३(२) तसेच त्यासह वाचा सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम २००२ चा नियम ३ च्या अनुसार त्यांच्याकडे असलेल्या अधिकारांच्या अनुसार त्यांनी मागणी सूचना निर्गमित करून सूचनेत नमूद केलेली रक्कम सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसात अदा करण्याची सूचना केली होती. आपल्याकडून नॉर्दर्न एआरसी कॅपिटल लिमिटेड यांना येणे असलेल्या रकमेचा तपशील खालील प्रमाणे नमूद करण्यात आलेल्या तालिकेत विस्ताराने देण्यात आला आहे. कृपया नोंद घ्यावी की येणे असलेल्या रकमेवरील पुढील व्याज आणि शुल्क, संपूर्ण रकम अदा होण्याच्या तारखेपर्यंत लागू असेल.

**१) अर्जदार / सह-अर्जदार/हमीदार व गहाणवटदारांची नाव :**
**ए) मे. हॉटेल दुर्गा (बिझनेसचे नाव), पत्ता :** सर्व्हे क्र. गट क्र. ४२, मौजे कोहकडेवाडी, मु.पोस्ट न्हावरा, पुणे, शिरुर, गोहदगंगाजवळ, सागर फॅक्टरी व हॉटेल दुर्गा पुणे, कोहकडेवाडी, पुणे - ४१२२११, महाराष्ट्र. **बी) श्री. संतोष यशवंत चौधरी (कर्जदार), सी) श्रीमती रंभाबाई संतोष चौधरी (सह-कर्जदार), पत्ता : दोघांचा रहिवासी पत्ता :** सर्व्हे क्र. गट क्र. ४२, मौजे कोहकडेवाडी, मु.पोस्ट न्हावरा, पुणे, शिरुर, गोहदगंगाजवळ, सागर फॅक्टरी व हॉटेल दुर्गा पुणे, कोहकडेवाडी, पुणे - ४१२२११, महाराष्ट्र. तसेच : मु. पोस्ट कुरुली, तालुका शिरुर, जिल्हा पुणे, न्हावरा, महाराष्ट्र - ४१२२११.

**२) कर्जाचा तपशील : (वितरित / एनपीए आणि सूचनेची तारीख / येणे असलेली रक्कम)**
ए) कर्ज खाते क्रमांक : १५०२४६५०१८८ रक्कम रु. २१,८२,१९८/- करिता (रुपये एकवीस लाख ब्याऐंशी हजार एकशे अठ्याण्णव मात्र), बी) एनपीए ॲसेट दि. ०२.०२.२०२५, सी) मागणी सूचनेची तारीख : ०७ फेब्रुवारी २०२५, येणे असलेली रक्कम रु. २३,०७,६३१.५७/- (रुपये तेवीस लाख सात हजार सहाशे एकतीस व सत्तावन्न पैसे मात्र) दिनांक ०७ फेब्रुवारी २०२५ रोजी व देय तारखेपर्यंतचे निव्वळ पुढील कंत्राटी व्याजासह प्रासंगिक खर्च, मूल्य व शुल्क आदी.

**३) स्थावर मालमत्तेचा तपशील :** सर्व भाग व भूखंड धारक गट क्र. ४२, मोजमापित जमिनीचे क्षेत्र ०० एच ०३ एकर व त्यावरील बांधकामांच्या सदर जमिनीचे कर्मशिअल मोजमापित क्षेत्र १५०५ चौ.फूट + ४३० चौ.फूट व रहिवासी मोजमापित क्षेत्र ४५५ चौ.फूट (ग्रामपंचायत मिळकत क्र. ०७९०/०२), गाव न्हावरा/कोहकडेवाडी, पुणे, महाराष्ट्र- ४१२२११. **उत्तर :** विलास लांडे यांची मालमत्ता, **दक्षिण :** अनिल लांडे यांची मालमत्ता, **पूर्व :** रस्ता, **पश्चिम :** प्रकाश लांडे यांची मालमत्ता.

आपणास याद्वारे आवाहन करण्यात येते की वरील प्रमाणे नमूद करण्यात आलेल्या तालिकेत रक्कम अधिक त्यावरील पुढील व्याज, शुल्क आणि अन्य आकार संपूर्ण रक्कम अदा होण्याच्या तारखेपर्यंत,, ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांत अदा करावी अन्यथा निम्नस्वाक्षरीकार हे नॉर्दर्न एआरसी कॅपिटल लिमिटेड यांना येणे असलेल्या रकमेच्या वसुलीसाठी निम्नस्वाक्षरीकार हे त्यांना सरफैसी कायदा कलम १४ आणि कलम १३ (४) च्य अनुसार प्राप्त झालेल्या अधिकारांच्या अन्वये वरील प्रमाणे नमूद करण्यात आलेल्या मालमत्तांवर कार्यवाही करण्यास पात्र असतील. तसेच सदरील कायद्याच्या कलम १३ (१३) च्या अनुसार सदरील संरक्षित मालमत्ता विक्री, लीज किंवा अन्य कोणत्याही माध्यमातून हस्तांतरित करण्यास आपणास मनाई करण्यात येत आहे.

**दिनांक :** १२.०२.२०२५
**स्थळ :** पुणे
सही/- प्राधिकृत अधिकारी, नॉर्दर्न एआरसी कॅपिटल लिमिटेडकरिता



**पुणे महानगरपालिका**
**भवन रचना विभाग**
**निविदा प्रक्रिया कक्ष**
**निविदा जाहिरात-नविन कामे**

१) ई-निविदा विक्री कालावधी :- १३/०२/२०२५ दुपारी २.३० वा. वाजेनंतर ते २२/०२/२०२५ दुपारी २.३० वाजेपर्यंत.
२) निविदा स्वीकृती व अंतिम दिनांक व वेळ :- १३/०२/२०२५ दुपारी २.३० वा. वाजेनंतर ते २२/०२/२०२५ दुपारी २.३० वाजेपर्यंत.
३) तांत्रिक बाबींचा लिफाफा उघडणे दिनांक :- २४/०२/२०२५ दुपारी ३.०० वा. वाजेनंतर

| अ. क्र | निविदा क्र. | खात्याचे नाव | कामाचे नाव | एकूण निविदा रक्कम | बयाणा रक्कम | कामाची मुदत | निविदा संच रुपये | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पी.एम.सी/भवन/ २४३/२०२४-२५ | भवन रचना विभाग | प्रभाग क्र. ३ मधील स.न. ३२/१+ ३२/१ ब येथे कम्युनिटी हॉल बांधणे | १०५२९६७१ | १०५२९७ | ६ महिने (पावसाळा कालावधीसह) | ६०७९ | श्री. प्रफुल्ल भटकर ८३०८७४४९९७ |

अ) पुणे मनपा ची वरील कामे ही अनुभवी/मनपा मान्यता प्राप्त/शासन मान्यता प्राप्त ठेकेदाराकडून (कामासाठीच्या पूर्वपात्रता अटी टेंडर सेट मध्ये नमूद केल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत.
ब) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ.बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
क) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाइन सादरीकरण न झाल्याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील.
ड) ऑनलाइन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती भवन विभाग पुणे मनपा येथे मिळेल.
इ) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/३२, दि. २२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS/RTGS/NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

जाहिरात क्र. २/१४४२ दि १२/०२/२५

(स्वाक्षरी/-)
कार्यकारी अभियंता
भवन रचना कार्यालय
पुणे महानगरपालिका



**निविदा सूचना**

क्राऊन प्लाझा पुणे शहर सेंटर यांच्याकरिता व पुणे, पुणेशहर आसपासच्या क्षेत्रातील व मुंबईतील विश्वासार्ह व सुस्थापित व्हेंडर्स व उत्पादकांकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| खाद्यपदार्थ व पेये | सर्वसाधारण बाबी व सेवा |
|---|---|
| • स्पाइसेस, ग्रोसरीज व ड्रायफ्रूट्स, महत्त्वाचा किराणा | • कार्यालय, जनरल प्रिंटिंग व स्टेशनरी |
| • टिन, बॉटलयुक्त खाद्यपदार्थ व तेल | • हाऊसकीपिंग, क्लीनिंग सप्लाइज |
| • स्थानिक भाजीपाला, बाहेरगावच्या भाजीपाला व फळे | • गार्बेज बॅग/एलडी बॅग |
| • फ्रेश नूडल्स, वोन्टोन शीट व टोफू, चपाती | • एलपीजी, डिझेल, चारकोल, जेल फ्युएल व लोकल केमिकल्स |
| • दूध व दुग्धउत्पादने, फ्रोझन पीज व कॉर्न | • स्क्रॅप मटेरियल |
| • पोल्ट्री व पोल्ट्रीउत्पादने | • फ्लोरिस्ट व फ्लॉवरअरेंजमेंट |
| • फ्रोझन कोल्ड कट, चिकन सलामी, पेपरोनी, सॉसेजेस, बेकन | • पेस्ट कन्ट्रोल सेवा |
| • बकरी व बकरी उत्पादने | • फेकेड क्लीनिंग सेवा |
| • आयात केलेले मांस व ताजे सी फूड व फ्रोझन सीफूड | • इंजिनीयरिंग मटेरियल (इलेक्ट्रिकल हार्डवेअर, पेंट्स, प्लंबिंग , कारपेंटरी) |
| • आइस्क्रीन व कुल्फीज् | • वर्तमानपत्रे |
| • इंडियन व इम्पो. चीज | • पॅकेजिंग गुड्स |
| • स्वीट्स व सॅव्हरीज | • कुरीयर सेवा |
| • ब्रेड व बेकरी उत्पादने | |

प्रत्येकी रु. ३०००/- नापरतावा प्रदानावर निविदा प्रपत्रे प्राप्त करता येऊ शकतील व ती क्राऊन प्लाझा पुणे शहर सेंटर येथील खरेदी व्यवस्थापकांकडे दि. १५.०२.२०२५ पासून स. ११.०० ते सायं. ५.०० या वेळेत उपलब्ध असतील.

**निविदा सादरीकरणाची अंतिम तारीख २८.०२.२०२५ रोजी सायं. ५.३० पर्यंत आहे**

निविदेवर पुढील बाब स्पष्टपणे नमूद असावी : एफएसएसएआय प्रमाणिकरण खाद्यविषयक बाबींकरिता अनिवार्य आहे. कालावधीकरिताचे दर निश्चित असून ते निर्दिष्ट कालावधीकरिता अपरिवर्तित राहतील. जीएसटी स्ट्रक्चर अटी स्पष्टपणे नमूद असाव्यात. हॉटेल स्वीकृती क्षेत्रात केवळ दिलेल्या वेळापत्रकानुसार वितरण नि:शुल्क करण्यात यावे. कोणतेही कारण न देता कोणतीही वा सर्व निविदा रद्द करण्याचा अधिकार हॉटेलकडे राखून आहे व यासंदर्भात कोणतेही सादरीकरण स्वीकारले जाणार नाही. मोहोरबंद निविदा खरेदी व्यवस्थापकांच्या नावाने सादर कराव्यात :

**क्राऊन प्लाझा पुणे शहर सेंटर**
सीटीएस क्र. ३७ व ३७/१, बंड गार्डन रोड, जहांगीर हॉस्पिटलच्या पुढे, पुणे -४११ ००१, महाराष्ट्र, भारत.
+ ९१ २० ६७२४८१८१ फॅक्स + ९१ २० ६७२४८३८३

HDFC BANK

**HDFC Bank Limited**
Marathon I T Park,
Bund Garden Road,
Opp. Hotel Sun N Sand,
Pune - 411 001.

## E-AUCTION NOTICE FOR SALE OF IMMOVABLE PROPERTY
## (U/Rule 8(6) read with Rule 9(1) of SARFAESI Act, 2002)

Immovable Property for sale under provisions of Securitization and Reconstruction of Financial Assets & Enforcement of Security Interest Act, 2002, for sale on "as is where is & what is there is Basis".

| Names of the Borrowers and Loan Account No. | Outstanding Dues for Recovery of which Properties are being sold | Location & Details of Immovable Property | Reserve Price | EMD | Date of inspection | Last Date of EMD Submission | Date(s) of E-Auction & Timing |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Borrower and Applicant/Guarantor ……..<br>1) M/s SHALOM ERP<br><br>2) ARUN BHARADWAJ S/o SATYANARAYAN BHARADWAJ<br><br>3) SMARANIKA BHARADWAJ W/o ARUN BHARADWAJ<br><br>Loan A/c No. : 50200039305059 and 8203280 | Rs.21,62,619.87** as on 01-Feb-2022 and 24-Feb-2022 (Twenty One Lacks Sixty Two Thousand Six Hundred and Nineteen point Eighty Seven Paise) | 1. All that piece and parcel of property Flat No.5 admeasuring an area of 675 sq. Ft. i.e., 62.73 sq.mtrs.(built up), on the SECOND Floor and the situated in building known as SHARMILEE APARTMENT and constructed on the land bearing S.No.165/2, plot no-11, situated within the Registration, Sub-Dist. Taluka Haveli, District Pune and within the limits of Pimpri-Chinchwad Municipal Corporation and situated at Revenue Village MOUJE Pimpri Vaghere. | Rs. 20,00,000/- ( Rupees Twenty Lacks Only) | Rs. 2,00,000/- (Rupees Two Lacks Only) | 13/02/2025 12.00 PM to 03.00 PM As per the availability of Officers. | 26/02/2025 | 27/02/2025 at 11.00 AM to 12.00 Noon with unlimited extension of 5 Mins. for every Successful Bid |

*** with further interest as applicable, incidental expenses costs, charges etc incurred till the date of payment and / or realization.**

**NB:** To the best of knowledge and information of the Authorized Officer (A.O.) of HDFC Bank Ltd, there are no encumbrances.

The particulars in respect of the secured assets specified hereinabove have been stated to the best of the information of the undersigned, who, however shall not be responsible for any error, misstatement or omission in the said particulars. The tenderer(s) / prospective purchaser(s) are, therefore requested in their own interests, to satisfy himself / themselves with regard to the above and the other relevant details pertaining to the abovementioned property / properties, before submitting the tenders.

HDFC BANK

**HDFC Bank Limited**
Marathon I T Park,
Bund Garden Road,
Opp. Hotel Sun N Sand,
Pune - 411 001.

**TERMS & CONDITIONS OF SALE:**

1. Sale is strictly subject to the terms & conditions stipulated in the prescribed Tender Document/ E-Bidding catalogue and in this notice. Further details of the immovable properties/secured assets and Tender Documents/Online Auction Catalogue can be collected/obtained from the Authorized Officer **HDFC Bank Ltd,HDFC Bank House,First Floor, MIT Marathon, Bund Garden Road,Pune 411001. between 10 a.m. to 5 p.m.** on any working day or can be downloaded from **https://eauctions.samil.in/home** Property is available for inspection between 12.00 p.m. and 3.00 p.m. on the date mentioned above

2. Sealed tenders (in the prescribed tender documents/e-bidding catalogue only) along with 10% of the Reserve Price amount towards Earnest Money Deposit (EMD) to be submitted at **HDFC Bank Ltd,HDFC Bank House,First Floor, MIT Marathon, Bund Garden Road,Pune 411001**. on or before, on or before date mentioned above. Payments shall be made only by Demand Drafts / Pay Orders drawn on a Scheduled Bank in favour of "HDFC Bank Ltd." payable at par at **Pune** Tenders received without EMD or beyond the above date prescribed herein will not be considered for sale. EMD deposited by the unsuccessful bidders shall be refunded to them within 30 days of finalization of sale. The EMD shall not carry any interest. The tenders will be opened at 2.30 p.m. on the date mentioned above. Sale shall be confirmed in the name of the tenderer of the successful bid only. The bid incremental values for said property will be **Rs. 10,000 /-**

3. Documents: along with tender documents/e-bidding catalogue the tenderer/s should also attach copy of his/her photo identity proof such as copy of the Passport, Addhar Card, Election Commission Card copy of the pan card issued by the income tax department, etc. Please note that proof of residence countersigned by the tenderer/offerer herself/himself also needs to be provided.

4. The borrowers, respective tenderers, guarantors or owners of the properties under sale may, if they so desire, give / sponsor his/ her/ their best possible valid offer(s) for the properties offered for sale provided he/she/they follow the requirements / terms and conditions of sale.

5. Please note that you (borrower) has liberty to pay the dues of the Bank with all costs, charges and expenses incurred by the Bank at any time before publication of Notice for E-auction or inviting quotations or tender from public or private treaty for transfer by way of lease or assignment or sale of such secured assets as provided under section 13(8) of the act.

**HDFC Bank Limited**
Marathon I T Park,
Bund Garden Road,
Opp. Hotel Sun N Sand,
Pune - 411 001.

6. The tenderers/prospective purchasers will be given an opportunity to increase/improve their offer/s during online auction. The additional terms and conditions for tenderers/prospective purchasers participating in online auction are: (A) **"Shriram Automall India Ltd."** Is Assisting The Authorized Officer In Conducting The Online Auction. (B) Detailed Terms And Condition For Participating In The Online Auction, Format, Application, Declaration, etc, Can Be Downloaded From Website **https://eauctions.samil.in/home** (C) Upon Receipt of The Necessary Documents As Mentioned Above Within The Stipulated Date and time, a password/user id will be provided by **"Shriram Automall India Ltd."** to Eligible Tender ers/Prospective Purchasers To Participate In The Online Auction at **https://eauctions.samil.in/home** Necessary trainings will be provided by **"Shriram Automall India Ltd."** for the purpose.

7. Statutory dues like property taxes/cess and/or builder/society dues, contribution to building repair funds, transfer charges, any other taxes etc. should be ascertained by the tenderer(s)/offerer(s)/prospective purchaser(s) and the same shall be borne and paid by the purchaser. The stamp duty, legal charges, registration charges and GST if any as applicable in respect of the sale certificate to be executed shall be paid by the purchaser alone.

8. The person declared to be the purchaser shall, immediately after such declaration, deposit 25% of the amount of purchase money to the 'Authorized Officer' immediately and remaining 75% to be deposited within 15 days from the date of auction date, in default of such deposit, the property shall forthwith be put up again and resold.

HDFC Bank reserves its right to accept or to reject highest and / or all offer/s without assigning any reasons.

**In case of any difficulty in obtaining Tender Documents/e-bidding catalogue or Inspection of the Immovable Properties / Secured Assets and for queries, Please Contact Concerned Officials of HDFC BANK LTD., Mr. Abhishek Joshi on 7276041922 or Email: abhishek.joshi11@hdfcbank.com or Mr. Nayan Jain on 9755555049 or Email: nayan.jain@hdfcbank.com on and Officials of "Shriram Automall India Ltd.". Bidder Support Numbers: Mr. Akanksha Srivastava Mob : 7428993237 Email ID-akanksha.s@cartradeexchange.com**

**THIS NOTICE SHOULD ALSO BE CONSIDERED AS 15 DAYS NOTICE TO THE BORROWER / MORTGAGER UNDER RULE 8(6) OF THE SECURITY INTEREST (ENFORCEMENT) RULE, 2002**

HDFC BANK LTD. PUNE Bund Garden Road

Authorised Officer